# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती

आपल्या भारत देशाचे वीर सैनिक हे केवळ आपल्या मातृभूमीचे संरक्षणच करीत नाहीत तर शांततेच्या काळात नैसर्गिक विपत्तीमध्ये सुद्धा धावून येतात, तसेच आतंकवादासारख्या असामाजिक तत्वाविरुध्द पण सतत लढत असतात. ब-याच शुरवीर सैनिकांनी अशा प्रसंगी आपले प्राण अर्पण केले आहेत किंवा त्यांना अपंगत्व प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर आपली सशस्त्र सेना नेहमी तरूण आणि कार्यक्षम रहावी म्हणून सैनिकांना ब-याच तरूण वयात निवृत्त करण्यात येते. याच कारणामुळे शहीद/अपंग तसेच आजी व माजी सैनिक व त्यांचे कुटुंबिय यांच्या करीता महाराष्ट्र शासन, सैनिक कल्याण विभागामार्फत आणि जिल्हा पातळीवर प्रत्येक जिल्हयातुन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या माध्यमातून माजी सैनिक तसेच त्यांचे कुटुंबिय यांच्याकरीता विविध कल्याणकारी योजना राबवित असते. अशा सैनिकांच्या प्रती शासन व समाजाने आपली कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे. म्हणूनच या ओळी नेहमी मनात रुंजी घालतात.

ए मेरे वतन के लोगो, जरा ऑखो में भरलो पानी,
जो शहीद हुए है उनकी, जरा याद करो कुर्बानी !

**जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे खालील मुख्य उद्देश आहेत :-**

अ. पहिला उद्देश म्हणजे युध्दामध्ये/यूध्दजय परिस्थितीमध्ये किंवा अतिरेकी कार्यवाहीमध्ये धारातीर्थी पडलेल्या शहिद जवानांना तसेच जखमी झालेल्या जवाना शासनातर्फे सानुग्रह अनुदान मिळवून देणे तसेच त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन करणे आणि..

ब. दुसरा उददेश म्हणजे, माजी सैनिकांचे पुनर्वसन आणि त्यांचेकरीता स्वयंरोजगार तसेच शासनाद्वारे उपलब्ध विविध कल्याणकारी योजना राबविणे. व त्यांचे निवृत्ती वेतन इ. संबंधी प्रश्न सोडविणे.

क) तिसरा उद्देश म्हणजे माजी सैनिक व त्यांचे कुटुंबिय यांच्या विविध विभागांशी संबंधित अडी-अडचणी समन्वयाने सोडविणे.

- अमरावती जिल्हयात एकंदरीत ४,५२० माजी सैनिक (३,२८७) /विधवा (१,२३३), तसेच अंदाजे २००० सेवारत सैनिक आहेत, त्यांची व त्यांच्यावर अवलंबित कुटुंबियांची संख्या अंदाजे २५ ते ३० हजार आहे. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती यांच्यातर्फे माजी सैनिक व त्यांचे अवलंबितांना वेगवेगळ्या बाबीखाली आर्थिक सहाय्य दिले जाते. जसे- चरितार्थाकरीता आर्थिक मदत (रु. ७००/- ते रु. १,०००/- प्रतिमाह ), मुलीचे विवाहाकरीता रु. ३/५,०००/-), ओषधोपचाराकरीता, स्वंयंरोजगाराकरीता,

युद्धविधवांना बस प्रवासाकरीता, अंत्यविधीकरीता, पाल्यांच्या शालेय तसेच उच्च शिक्षणाकरिता शैक्षणिक मदत व शिष्यवृत्ती इ.(याकरीता माजी / विधवा महाराष्ट्राची रहिवासी असणे आवश्यक आहे). वर्ष २००९-२०१० मध्ये जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने माजी सौनिक/ विधवा यांना खालीलप्रमाणे आर्थिक मदतीचे वाटप केले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | चरितार्थाकरीता (६५ प्रकरणे) | - | रु.५,८८,७००/- |
| ब) | अंत्यविधी (६५ प्रकरणे) | - | रु. १,९५,०००/- |
| क) | मुलीचे लग्न (२० प्रकरणे) | - | रु. ७२,०००/- |
| ड) | पाल्यांचे शिक्षणार्थ व शिष्यवृत्ती (२३३ | - | रु. ११,५७,०४२/- |
| इ) | संगणक प्रशिक्षण (१७ प्रकरणे) | - | रु. ४४,०००/- |
| ई) | औषधोपचार/इतर (२४ प्रकरणे) | - | रु. १,३३,३४०/- |
| उ) | वसतिगृह प्रतिपूर्ती | - | रु. २,३०,०००/- |
| | एकूण | - | **रु. २४,२०,०८२/-** |

➢ अमरावती जिल्ह्यामध्ये द्वितिय महायुद्धात भाग घेतलेले ३७७ अति-वयोवृद्ध माजी सैनिक/विधवा आहेत, ज्यांना कोणत्याही प्रकारची पेंशन मिळत नाही. परंतु महाराष्ट्र शासनातर्फे त्यांच्या पायी एक कृतज्ञता म्हणून त्यांना रु. १,२७५/- दरमहा अनुदान देण्यात येते. सन २००९-१० मध्ये अशा ३९३ लाभार्थ्यांना एकूण **रु. ६१,३९,१२५/-** चे अनुदान वाटप करण्यात आले आहे. याशिवाय शहरामध्ये माजी सैनिक/विधवा पाल्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्या याकरीता प्रत्येकी ५० जणांची क्षमता असलेले प्रत्येकी एक सैनिकी मुलांचे वसतिगृह नवसारी येथे व सैनिकी मुलींचे वसतिगृह नंदनवन कॉलनी येथे चालविण्यात येते. याकरीता माजी सैनिक/विधवा यांच्या पाल्यांकडून अतिशय माफक दर आकारणी केली जाते व त्यामुळे सैनिक कल्याण विभागाकडून मागील वर्षी रु. ७.५ लाख इतका खर्च वसतिृह चालविण्यावर करण्यात आला आहे.

➢ महाराष्ट्र शासनाने अमरावती जिल्ह्याला सशस्त्र सेना ध्वजदिन- २००९ निधी संकलनाकरीता रु. २७ लाखाचे उद्दिष्ट दिले होते. अभिमानाची गोष्ट अशी की, अमरावती जिल्ह्याने सातत्याने दरवर्षी आपले १००

% उद्दिष्ट पूर्ण केले आहे. एवढेच नव्हे तर मागील दोन वर्षापासून जिल्ह्याने २०० % च्या वर निधी गोळा करुन हे सिद्ध करून दाखविले आहे की, अमरावती जिल्हा हा ख-या अर्थाने तीनही सेनादलाचे सर्वोच्च प्रमुख असलेल्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचा जिल्हा आहे. "ध्वजदिन निधी संकलनामध्ये" दरवर्षी अमरावती जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे भरभरुन योगदान लाभत असते व हा निधी अमरावती जिल्ह्यामध्ये सामान्य नागरीकांकडून गोळा न करता सर्व शासकीय तसेच निमशासकीय अधिकारी व कर्मचारी स्वतः आपले वैयक्तिक योगदान देवून संकलित करीत असतात हे विशेष. इथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, अमरावती जिल्ह्याने ध्वजदिन निधीचे मागील वर्षी **रु. ५३,४०,०००/-** इतके संकलन केले होते. व प्रत्यक्षात माजी सैनिकांकरीता वेगवेगळ्या कल्याणकारी योजना राबविण्याकरीता **रु. ९३,०९,१२५/-** इतका खर्च केला आहे.

**भरतीपूर्व प्रशिक्षण शिबिर.** अमरावती जिल्हयातील तरूणांचे सैन्यभरतीमध्ये प्रमाण वाढावे या हेतूने कार्यालयातर्फे ५० मुलांचे एक प्रशिक्षण शिबिर दरवर्षी चालविण्यात येते. या वर्षी १०० मुलांचे एक प्रशिक्षण शिबीर फेब्रुवारी महिन्यात चालविण्यात आले.

**माजी सैनिक पत्नी व विधवा यांचा मेळावा.** माजी सैनिकांच्या पत्नी तसेच त्यांच्या विधवा यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी तसेच त्यांना स्वयंरोजगाराकरीता प्रेरीत करावे या हेतूने माजी सैनिकांच्या पत्नी व विधवा यांचे मेळावे घेण्यात येतात. मेळाव्यामध्ये बचतगट स्थापना, कल्याणकारी योजनांची माहिती तसेच जिल्हा उदयोग केंद्र अमरावती व मिटकॉन यांचेकडून मार्गदर्शन करण्यात येते. **स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून असाच मेळावा दि १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सैनिकी मुलींचे वसतिगृह नंदनवन कॉलनी येथे आयोजीत करण्यात आला आहे. यावेळी लाभार्थ्यांना आर्थिक मदतीचे वाटप करण्यात येणार आहे.**

**पॉलीक्लीनिक.** दि ०१/२/२००५ पासून माजी सैनिक व त्यांचे अवलंबिताकरीता अंशदायी स्वास्थ योजने अंतर्गत सदस्य झालेल्यांकरीता मोफत वैदयकीय सेवा ईसीएचएस पॉलीक्लीनिक , मोर्शी रोड येथे सूरू करण्यात आली आहे.

**सी.एस.डी. कॅन्टीन** अमरावती येथे माजी सैनिकांकरीता. सर्व जीवनाश्यक वस्तु माफक दरात पुरविण्याच्या दृष्टीने सी. एस. डी कॅन्टीन सुद्धा कार्यरत आहे.

---